वाचले :-

१. मा.अंशकालीन प्राचार्य, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे – १९ यांचेकडील पत्र क्र.औप्रसंपिंचि/शिप्रया/२०१८-१९/१८७५, दि.२४/०८/२०१८.

२. जाहीर प्रकटन क्र.प्रशा/११/कावि/४५५/२०२१, दि.२५/१०/२०२१ अन्वये प्रसिध्द जाहिरात.

३. क्र.प्रशा/१०/कावि/६५१/२०२१, दि.१७/०९/२०२१ नुसार टेबल क्र.१० कडून प्राप्त आरक्षण.

४. दिनांक २२/०१/२०२२ चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.
प्रशासन विभाग
क्र.प्रशा/११/कावि/३५/२०२२.
दि.०२/०२/२०२२.

**विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानगरपालिका अस्थायी आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींची नेमणूक करणेबाबत. ..**

**आदेश,**

वाचले क्र.१ अन्वये कळविणेत आलेनुसार शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींच्या विविध व्यवसायासाठी जागा उपलब्ध आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत सन-२०२१-२२ चे सत्राकरीता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींची नेमणूक करण्यास वाचले क्र.२ अन्वये अर्ज मागविणेसाठी महापालिका संकेतस्थळावर जाहिर प्रकटन प्रसिध्द करून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांची प्राप्त गुणानुक्रमानुसार तसेच वाचले क्र.३ अन्वये आरक्षणानुसार सन २०२१-२२ या सत्राकरीता खालील शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींची आरक्षण व गुणानुक्रमानुसार नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | व्यवसायाचे नाव | पदांची संख्या | प्रशिक्षण कालावधी | उ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | नेमणूकीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | ६ | १ वर्ष | १ | कल्याणकर रूपाली खांडेराव | इतर मागास प्रवर्ग | खुला | 94.15 |
| | | | | २ | निटनवरे राहूल उत्तम | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 77.2 |
| | | | | ३ | कोरे निकीता संभाजी | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (क) | 76.54 |
| | | | | ४ | डोके ऋषिकेश नवनाथ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | 73.99 |
| २ | भूमापक (Surveyor) | ६ | १ वर्ष | १ | कोळी अक्षय सिध्देश्वर | खुला | खुला | 81.08 |
| | | | | २ | वैरागे अंजली गुलाब | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 77.38 |
| ३ | नळ कारागीर (Plumber) | २५ | १ वर्ष | १ | अहिरे ऋषिकेश सिध्दार्थ | अनुसूचित जाती | खुला | 84.86 |
| | | | | २ | पवार जितू सावकर | अनुसूचित जमाती | खुला | 84.29 |
| | | | | ३ | नवथळे शंकर जगन्नाथ | इतर मागास प्रवर्ग | खुला | 83.14 |
| | | | | ४ | शेख आरकन युसूफ | खुला | खुला | 83.14 |
| | | | | ५ | गुप्ता सिध्दार्थ श्यामालाल | भटक्या जमाती (ब) | खुला | 83.00 |
| | | | | ६ | बाविस्कर राहूल संजय | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 80.86 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ७ | भावे विपुल केशव | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 79.14 |
| | | | | ८ | शिंदे तुषार दिलीप | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | 79.00 |
| | | | | ९ | रेवतकर नयन बापुराव | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 76.57 |
| | | | | १० | गलांडे प्रविण नवनाथ | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (क) | 75.00 |
| | | | | ११ | पिंजारी दानिशखान सईदखान | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 74.43 |
| | | | | १२ | कांबळे सुमित रघुनाथ | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 73.14 |
| | | | | १३ | साळवे संदीप पितांबर | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 72.29 |
| ४ | वीजतंत्री (Electrician) | २५ | १ वर्ष | १ | बेलदार राजेंद्र तुळशीराम | भटक्या जमाती (ब) | खुला | 86.5 |
| | | | | २ | शर्मा वैभव राजू | खुला | खुला | 86.43 |
| | | | | ३ | राठोड आंचल सुदाम | विमुक्त जाती (अ) | विमुक्त जाती (अ) | 85.43 |
| | | | | ४ | मनवर नितेश प्रकाश | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 84.5 |
| | | | | ५ | भिकन एस.के. रिहान | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | 83.29 |
| | | | | ६ | तारू प्रफुल्ल दिलीप | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (ब) | 82.57 |
| | | | | ७ | कोरेबैनवाड कैलास गणपती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | 82.00 |
| ५ | तारतंत्री (Wireman) | २५ | १ वर्ष | १ | चौधरी रितेश सुभाष | इतर मागास प्रवर्ग | खुला | 87.00 |
| | | | | २ | राठोड विशाल त्र्यंबक | खुला | खुला | 85.29 |
| | | | | ३ | इंगळे नितीन सारंगधर | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 83.86 |
| | | | | ४ | माने अतिश कोंडीबा | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 83.21 |
| | | | | ५ | वनलवाड श्रीकांत गोविंद | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (ब) | 81.29 |
| | | | | ६ | राठोड निर्मल श्रीकृष्ण | विमुक्त जाती (अ) | विमुक्त जाती (अ) | 80.57 |
| | | | | ७ | कुलाल अमित गजानन | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 80.29 |
| | | | | ८ | टिंगणे तुषार संजय | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 77.5 |
| ६ | पंप चालक तथा यांत्रिक (Pump Operator Cum Mechanic) | १५ | १ वर्ष | १ | रायभोळे कृष्णा भिमराव | अनुसूचित जाती | खुला | 81.14 |
| | | | | २ | शेख शफ्फॉन अहमद | खुला | खुला | 81.14 |
| | | | | ३ | महाजन शुभम रविंद्र | खुला | खुला | 79.71 |
| | | | | ४ | खोजर करण धिरज | आर्थिक दृष्ट्या दुर्बल | खुला | 79.29 |
| | | | | ५ | गनविर धिरज नविंद्रराज | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | 70.29 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | यांत्रिक मोटारगाडी (Mechanic Motor Vehicle) | ५ | १ वर्ष | १ | रासेकर शुभम विलास | इतर मागास प्रवर्ग | खुला | 83.64 |
| | | | | २ | माने विशाल बबन | अनुसूचित जाती | खुला | 82.79 |
| ८ | माळी (Gardner) | १५ | १ वर्ष | १ | गोसावी कुणाल मनोज | भटक्या जमाती (ब) | खुला | 88.2 |
| ९ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (रेडिओलॉजी) (MLT – Radiology) | ३ | ६ महिने | १ | जायेभाये गजानन त्र्यंबक | खुला | खुला | 90.83 |
| १० | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (कार्डीओलॉजी ॲन्ड फीजीओलॉजी) (MLT – Cardiology and Physiology) | २ | ६ महिने | १ | गंडे रवि जानकीराम | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | 66.62 |
| ११ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (पॅथॉलॉजी) (MLT – Pathology) | ९ | ६ महिने | १ | गायकवाड गणेश तानाजी | अनुसूचित जाती | खुला | 94.29 |

नेमणूक करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींकरीता प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१. apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) वर उमेदवाराने स्वत:ची वैयक्तीक, शैक्षणिक माहिती (Profile) अद्ययावत (Update) करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. सदरची नेमणूक ही उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता आय.टी.आय. उत्तीर्ण तसेच शाळेचे, जातीचे, आधारकार्ड, apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) पोर्टलवरील रजिस्ट्रेशन इत्यादी प्रमाणपत्राच्या छायांकीत सत्यप्रती तपासून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास तसेच प्रशिक्षणार्थीनी आदेशातील अटी व शर्तींचा भंग केल्यास देण्यात आलेली नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

३. व्यावसायिक प्रशिक्षणार्थी म्हणून या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक पूर्णत: तात्पुरती, एक वर्ष व १२ वी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची नेमणूक सहा महिने अशा निश्चित कालावधीसाठी आहे. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात येईल. नेमणूक देण्यात आलेल्या उमेदवार प्रशिक्षणार्थींचा व्यावसायिक पदावरील महापालिका आस्थापनेवर कोणताही हक्क राहणार नाही.

४. नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून ०८ दिवसांचे आत रूजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच सदर पदासाठी मनपा संकेतस्थळावरील केलेल्या अर्जाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

५. शिकाऊ उमेदवारास नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. या कालावधीत कोणतीही तात्पुरत्या स्वरूपातील नोकरी इतरत्र करता येणार नाही.

६. प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणूक आढळून आल्यास त्यांस कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता प्रशिक्षणार्थी पदावरून कमी केले जाईल तसेच कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

७. शिकाऊ उमेदवारांना पुर्ण वर्षाकरीता ०८ दिवस किरकोळ रजा व १५ दिवस वैद्यकीय रजा अनुज्ञेय राहतील. तसेच दर तीन महिन्यानंतर वेगवेगळ्या विभागात तसेच क्षेत्रिय कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणे क्रमपात्र असणार आहे.

८. प्रशिक्षणाची वेळ ही संबधित कार्यालयाचे वेळेप्रमाणे राहील. सर्व शासकीय सुट्टया देय राहतील. उमेदवारांना शिफ्टमधील कामकाज देता येणार नाही. नेमणूक दिलेल्या व्यवसाय निहाय पदाचेच काम करणे बंधनकारक राहील अन्य कोणतेही कामकाज करता येणार नाही. तसे झाल्यास उमेदवार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार दाखल करू शकतील.

९. शिकाऊ उमेदवारांची संविदा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, निगडी,पुणे- १९ यांचे कार्यालयात कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन (रजिस्ट्रेशन) नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास त्यांची नेमणूक त्वरीत रद्द होऊन त्यांना परिक्षेस बसण्यास अडचण निर्माण होऊ शकते. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे यांचे आदेशानुसार उमेदवारांना कार्यमुक्त करण्यात येईल, याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे-१९ यांचेमार्फत होणा-या परिक्षेस बसण्यास आवश्यक कागदपत्रांची तसेच परिक्षा फी ची पुर्तता संबधित उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे. त्याकरीता apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) या संकेतस्थळावर माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे दरमहाची हजेरी पत्रकावरील उपस्थिती व विद्यावेतन जमा झालेल्या बँक पास बुकची छायांकीत प्रत संबधित शाखाप्रमुखांचे स्वाक्षरीने प्रशासनास सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव परीक्षेस बसता आले नाही तर त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

११. उमेदवारांनी नेमणूक दिलेल्या विभागात रूजू झाल्यानंतर स्वत:चे ओळखपत्र तसेच बँक पासबुक दोन दिवसात प्राप्त करून संबधित विभागास सादर करावे. त्याचप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून थंम्ब मशिनवर नोंद करून घ्यावी. आपल्याला देण्यात येणारे विद्यावेतन थंम्ब रिपोर्टवरून अदा करण्यात येणार असल्याने कार्यालयीन वेळेतच कार्यालयामध्ये उपस्थित रहावे व कार्यालयीन वेळेनंतरच कार्यालय सोडणे बंधनकारक राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१२. apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) संकेतस्थळावर करार नोंदणी केलेनंतर करार कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात आणता येणार नाही.

१३. केंद्रशासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

१४. निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी / शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वरिष्ठांनी नेमून दिलेले कामकाज करण्यास नकार दिल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करणेत येईल.

१५. उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१६. नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.सहाय्यक आयुक्त (प्रशासन) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी शिकाऊ उमेदवार नेमणूक प्रशिक्षणार्थी कालावधी समाप्त करण्याचा अधिकार राहील.

१७. शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण कालावधीमध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८. शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा प्रकारचा इतर कोणताही व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील. तसेच त्यांना कामकाजासंबंधीची कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१९. शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेणेत येईल.

(सही/-)
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति,

व्यवसाय निहाय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्यात आलेले सर्व संबंधित उमेदवार यांचे माहितीकरीता महापालिका संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येईल.

प्रत – १. संगणक कक्ष (प्रशासन) - प्रसिध्दीकरीता.

२. लेखा विभाग.

३. मुलेप विभाग.

४. संबंधित विभाग.

शिकाऊ उमेदवारांना प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेपुर्वी बायोमेट्रीक थंम्ब हजेरी प्रमाणे विद्यावेतन त्यांचे बँक खात्यामध्ये जमा केल्याचा पुरावा म्हणून बँक पासबुकची प्रत व बायोमेट्रीक हजेरीची छायांकीत प्रत शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांचे स्वाक्षरीने प्रशासनास सादर करावी. सदरची माहिती दर महिन्याचे ०५ तारखे पर्यंत सादर न केल्यास अथवा विलंबाने सादर केल्यास शासनाकडून मिळणा-या परताव्याच्या रक्कमेची सर्वस्वी जबाबदारी संबधित विभागाची राहील. प्रशिक्षणार्थींना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देण्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. व्यवसाय निहाय प्रशिक्षण देण्यात यावे त्यांच्यावर इतर कामे सोपविण्यात येऊ नयेत. प्रशिक्षणार्थींनी याबाबत मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार केल्यास त्यास संबधित जबाबदार राहतील. प्रशिक्षणार्थी सतत गैरहजर राहिल्यास तसेच कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्यास त्यांचेवर विभागप्रमुखांनी कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची प्रत प्रशासनास सादर करावी. कार्यालयात उशीरा हजर राहील्यास नियमानुसार रजा खर्ची टाकण्यात याव्यात. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या एक महिना आधी प्रशिक्षणर्थींची संपूर्ण वर्षाची उपस्थिती व विद्यावेतन त्यांचे बँक खात्यावर जमा झाल्याच्या पासबुकची छायांकीत प्रत आपले स्वाक्षरीसह प्रशासनास सादर केल्याची खात्री करावी अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता न आलेस सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील. व्यावसायिक परिक्षेस बसण्यास आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून आपले मार्फत परिक्षा फॉर्मवर स्वाक्षरी देण्यात यावी.

मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कालावधी निश्चित केलेनुसार प्रशिक्षणार्थींना महापालिकेत नेमणूक दिल्याने त्यांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना विभागामार्फत कार्यमुक्त करण्यात यावे. उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित असल्याने त्यांच्या कालावधीत वाढ होणार नाही याची खबरदारी घेऊन कालावधीत वाढ करणेबाबतचे प्रस्ताव सादर करू नयेत.

५. मा.अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र,
द्वारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था पिंपरी, चिंचवड, टेल्कोरोड, निगडी, पुणे-४११०१९.
यांना माहितीकरीता सादर.